# आभास

लेखक : नारायण धारप

**समन्वय प्रकाशन, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**आभास : नारायण धारप**

**प्रकाशक**
समन्वय प्रकाशन
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. नं.: ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे.

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१३

**किंमत**
रुपये १९०/-

# जयदेव!

आमची श्रीमंती पिढीजात होती. अगदी शब्दशः पिढीजात. माझ्या वडिलांच्या वेळेपर्यंत मॅनेजमेंट, उद्योगकता, एंट्रेप्रेनरशिप यांचा अभ्यास किंवा विकास झाला नव्हता. मला कॉमर्सची डिग्री मिळाल्यावर एम. बी. ए.कडे जाण्याचा माझा विचार मी बाबांना बोलून दाखवला. जरासं हसत ते म्हणाले,

'मोहन, तुला एम. बी. ए.ची पदवी कशासाठी हवी?'

'का?' मी नवलाने विचारले. 'मी तुमचा एकुलता एक मुलगा आहे. तुमच्या या सर्व व्यापाचा वारस आहे. तुमच्या मागे मीच या सर्वाचा मालक होणार आहे. हो ना?'

'अगदी बरोबर.' मी थांबताच बाबा म्हणाले, 'मग?'

'पण बाबा!' मी म्हणालो, 'मनी मॅनेजमेंट हेसुद्धा आता एक शास्त्र झालं आहे! सारं जग आता आकुंचन पावलं आहे! कोणताही देश, कोणताही व्यवसाय, कोणतंही मार्केट आता अलिप्त राहू शकत नाही! सारं जग आता एक फोन कॉल, एक फॅक्स मेसेज... एवढ्याच अंतरावर आहे!' एवढ्या एवढ्यातच मी एका वर्तमानपत्रातल्या फायनाशियल कॉलमध्ये ही वाक्यं वाचली होती- ती अगदी सहजपणे जिभेवर आली. पण बाबांच्यावर या पांडित्याचा काहीही परिणाम झाला नाही. हात हवेत उडवत ते म्हणाले, 'मला याची काहीही आवश्यकता वाटत नाही. पण तुझी खरोखरच इच्छा असेल तर तू तिकडे अवश्य जा- मी तर म्हणेन की हार्वर्डसारख्या एखाद्या जगत्मान्य युनिव्हर्सिटीतच जा की! तेवढाच परदेश प्रवासही होईल! एकदा का तुझ्या खांद्यावर माझ्या व्यापाचं हे सर्व ओझं आलं की मग हलणं मुश्कील होईल. ठरव तुझं तूच.'

या मुलाखतीने माझं अजिबात समाधान झालं नाही. मी त्यांना सांगितलेलं एकूण एक खरं होतं. त्यांच्या मागे खरोखरच मीच एकटा साऱ्याचा वारस होतो. त्यांनी तरी माझ्या शिक्षणाबद्दल अशी बेफिकीरी खासच दाखवायला नको होती. पण त्यांच्या ओजळपणाबद्दल शंकाच नव्हती.

तेव्हा मग त्यांच्या या वागण्यामागे काय रहस्य होतं? कदाचित त्यांनी अशीही एक कल्पना असेल की, (ब्रिटीश साम्राज्यासारखी) त्यांनी जी एक पोलादी चौकट उभी केली होती ती त्यांच्यामागेही तशीच कार्यरत राहील, पुरेशी होईल? खरोखर, या यशस्वी आणि महत्त्वाकांक्षी माणसाचं काही सांगता येत नाही.

माझ्या बाबांना यशस्वी नाही म्हणायचं तर मग कोणाला? आमच्या ग्रूपचं नाव (ते मी अर्थातच सांगणार नाही!) भारतात तर मशहूर आहेच, शिवाय जगातल्या काही देशांतही सुविख्यात आहे. आमची वार्षिक उलाढाल पाचशे कोटींच्यावर आहे. पोलाद, रसायन, रंग, कापड, कागद, सिमेंट, वाहने...सर्व क्षेत्रात आमच्या पार्टनरशिप आहेत, नाहीतर कोलॅबरेशन्स आहेत, नाहीतर सबसीडीयरी इंटरेस्ट आहेत, नाहीतर प्रोपायटरी कन्सर्न आहेत. बाबा कितीतरी कंपन्यांच्या डायरेक्टर बोर्डावर आहेत. एवढ्या जबाबदाऱ्यांचा ताण त्यांच्यावर पडत असलाच पाहिजे– पण तो त्यांच्या वागण्यात कधी जाणवत नसे. त्यांची झोप कधी उडालेली नाही, ते कधी त्रासलेले नाहीत, त्यांचा रक्तदाब कधी वाढलेला नाही. त्यांना कधीही अल्सर किंवा अपचनाचा त्रास झालेला नाही. एखाद्या अजस्र पोलादी जहाजाने सागराचं पाणी सहज कापत प्रवास करावा तितक्या सहजपणे ते आयुष्याशी कालक्रमणा करीत होते. त्यांचे प्रवास, त्यांच्या सहली, त्यांच्या 'मैत्रिणी'...

शेवटी मी जगदाळेंना जरा एका बाजूस गाठून हा प्रश्न विचारलाच. हे जगदाळे म्हणजे बाबांच्या अगदी विश्वासातला, खूप जुना माणूस. मला तर वाटायचं, बाबा एखादे वेळी एखादी गोष्ट मला सांगणार नाहीत, पण या जगदाळेंना सांगतील...

'तुला त्याचं नवल वाटतं, आता, मोहन?' जगदाळे मान हलवत म्हणाले.

'मी तर गेली कितीतरी वर्षं याचं नवल करीत आलो आहे. तुझे वडील मोठे विलक्षण गृहस्थ आहेत, मोहन–'

'विलक्षण म्हणजे कसे?'

'आता पाहा ना– लोकशाहीचा सारा देखावा त्यांनी स्वतःभोवती उभा केला आहे खरा– डायरेक्टरांची बोर्ड आहेत, कमिट्या आहेत, पॅनेल आहेत... पण खरे

निर्णय कोण घेतं माहीत आहे का?'

'कोण?'

'तुझे वडील.'

'बाबा?'

'हो. ते आणि तेच एकटे. कुरकूर करणारे, तक्रार करणारे, विरोध करणारे नाहीत असं नाही– पण तुझ्या वडिलांचे निर्णय इतके अचूक असतात की मग त्यांच्या टीकाकारांना तोंड दाखवायला जागाच राहात नाही!'

'आणि बाबांच्या हातून कधीही चूक झालेली नाही?'

'एकदा झाली होती–' जगदाळे आवाज खाली आणत म्हणाले, 'एकदा झाली होती... पण त्यांनी वेळीच निर्णय फिरवला... आणि काही कोटींचा फटका बसायचा तो जेमतेम काही लाखांवरच निभावला. तेवढ्या एकाच वेळेला मी त्यांना भावनेच्या आहारी गेलेलं पाहिलं आहे... राग होता, तिरस्कार होता, संताप होता, शरमही होती...पण एक नवलाची गोष्ट आहे...माझी खात्री आहे हे दुसऱ्या कोणाविरुद्ध नव्हतं. स्वतःविरुद्धच होतं...'

'स्वतःवरचा संताप? स्वतःचीच शरम?'

'यापेक्षा मी जास्त स्पष्ट करूच शकत नाही, मोहन!' जगदाळे म्हणाले. 'पण ती एकच आणि शेवटचीच वेळ होती...पुन्हा त्यांच्यावर ती वेळ आली नाही...'

'मी त्यांना याबद्दल विचारलं तर रागावतील?'

'रागावणार नाहीत...कशासाठी रागावतील? त्यांच्या कामाची ही पद्धत सर्वश्रुत आहे. विचारून तर पाहा! तू तर त्यांच्या दृष्टीने स्पेशलच आहेस... एखादे वेळी सांगतीलही...किंवा थट्टेवारी नेतील...'

'किंवा चूप! म्हणून ओरडतील.' मी म्हणालो.

'हो तेही शक्य आहे.' जगदाळे हसत म्हणाले. पण माझ्यासाठी तो विषय संपला तर नव्हताच. उलट ती तर सुरुवात होती.

आमच्या वाड्याची वास्तू कितीतरी पिढ्या मागे जाते. आपल्या घराण्याची आर्थिक ताकद वाढत चालली तसतशी मागच्या पिढीतल्या लोकांनी आसपासची घरं, वाडे, जागा, जमिनी विकत घेण्याची मोहीमच चालू केली. आता शहराच्या अगदी मध्यवस्तीत सुमारे एकरभराच्या आवारात आमचा वाडा उभा आहे. वाड्याबद्दल आमच्या पूर्वी नाना (अगदी बाबांच्यासह!) काहीतरी भावनिक आकर्षण असलं

पाहिजे-कारण वाड्याच्या मूळ वास्तूला कोणीही हातही लावलेला नाही. जुना सनला जाऊन तिथे घॅस्टर, किंवा वॉपेपर, किंवा म्यूरवची लॅमिनेट झाली आहेत. जुने लाकडी गजादारांचे झरोके जाऊन त्या जागी रुंद, सरकत्या काचांच्या खिडक्या आल्या आहेत. जुनेगच्ची गेली आहे, तिथे आता मोझेकचा सुंदर टेरेस आहे. त्या चौघई वाड्यात पूर्वी खूप अंधारलेल्या खोल्या, अंधारे बोळ, काळोखी जिने असले पाहिजेत... आता सर्वत्र लखलखाट आहे.

पण वाड्याच्या मूळच्या वावभर रुंदीच्या भिंतींना हातही लागलेला नाही. कोणत्याही खोलीचा आकार बदललेला नाही, दारांची अदलाबदल झालेली नाही. विवाह होऊन त्या वास्तूत आल्यावर आईने (आता ती हयात नाही) या जुन्या वास्तूबद्दल नाराजी दाखवली होती. तिच्यासाठी बाबांनी वाड्याला लागूनच चार खोल्यांचा अत्याधुनिक ब्लॉक बांधवून घेतला होता. तिच्यावर त्यांनी कोणतीही सक्ती केली नाही, पण वाड्यातल्या दिवाणखान्यातली त्यांची खास खोलीही सोडली नाही. त्या खोलीत जाण्यास नोकरचाकरांना आणि तिऱ्हाईत-अपरिचितांना मज्जाव असला तरी मी अर्थात तिथे केव्हाही जाऊ शकत होतो. आणि आता मनात हे नवीन कोडे आल्यापासून जरा विचलित झालेल्या, धार आलेल्या नजरेने मी बाबांची खोली पाहू लागलो.

पण तिथे पाहण्यासारखं काय होतं? त्यांचं कामाचं मोठं टेबल होतं, त्यामागे आरामशीर खुर्ची होती. भेटायला कोणी आलंच (अगदी अपवादात्मक गोष्ट) तर त्यांच्यासाठी तीन आरामखुर्च्या होत्या. एक गोल मेज होतं. छताला साधा पंखा होता. एकाच अंगाला अंगणात उघडणाऱ्या उंच खिडक्या होत्या, त्यांच्यावर फिकट रंगाचे सरकते पडदे होते. एका कोपऱ्यात एक बैठा पलंग होता, त्याच्यावर खूप जाड गादी होती, लोड तक्के होते, बाबांचं पानदान होतं. एखाद्या यशस्वी व्यावसायिकाच्या कार्यालयात ज्या गोष्टी अपेक्षित असतात त्याची खूणही नव्हती. फाईल कॅबिनेट नव्हती, टेलिफोन नव्हता, सेक्रेटरीसाठी टेबल-टाईपरायटर नव्हता, टेबलावर एक साधा कागदही नव्हता.

बाबांना वाचनाचा नाद होता-पण कोणत्या पुस्तकांचा? साहसकथा, रहस्यकथा, हलक्या फुलक्या कादंबऱ्या-अशांचा. मोठमोठ्या यशस्वी लोकांच्या मुलाखती मी वाचतो- त्यांचे आवडते लेखक विचारले की रसेल, ड्यूकर सार्म इत्यादी तत्त्ववेत्ते-समाजशास्त्रज्ञांची नावे येतात. म्हणजे ते लोक खोटं बोलत असतील

असं मला म्हणायचं नाही– पण बाबा त्यांच्या रांगेतले नव्हते एवढंच नमूद करायचं आहे. केवळ निरीक्षणाने आणखी काहीही हाती लागणार नाही अशी खात्री झाल्यावर मग एका सकाळी न्याहारीच्या वेळी मी बाबांपाशी हा विषय काढला.

दिवसातून आम्ही दोघं फक्त त्याच वेळी काही वेळासाठी तरी एकत्र येत होतो. मग माझे कॉलेजचे तास, त्यांच्या व्यावसायिक बैठका, मग त्यांची संध्याकाळची कुठली कुठली निमंत्रणं–किंवा रात्रीच्या पंक्तीला एखादे आमंत्रित–

'बाबा, मला तुम्हाला एक विचारायचं आहे.'

'मग विचार की!'

'कदाचित ते तुम्हाला आवडणार नाही.'

'शक्य आहे. तरीही विचार!'

'पण समजा– उत्तर देणार असालच–तर एक अट आहे.'

'काय?'

'संपूर्ण आणि खरं उत्तर द्यायचं–लपवाछपवी नाही–'

'मान्य आहे. विचार.'

'जगदाळे मला तुमच्या संबंधात काही सांगत होते.'

'आशा आहे त्यात टीका किंवा निंदा नसेल–' बाबांचा जड विनोद.

'तुमच्याबरोबर इतकी वर्षे काम करूनही तुम्ही त्यांना अज्ञातच आहात– म्हणजे असं की तुमची कामाची पद्धत त्यांना समजत नाही.'

'त्याची काय आवश्यकता आहे?'

'का नाही? आयुष्यात इमर्जन्सीज काय येत नाहीत? असं काही होऊ नये पण दुर्दैवाने काही झालंच–तुम्हाला काही झालं, व्याप सांभाळणं अशक्य झालं, काही आजार–अपघात झाला, मग हा सारा व्याप कोण सांभाळणार?'

बाबांच्या चेहऱ्यावर आधी हास्य झालं, मग ते गंभीर झाले.

'मोहन, तुझी शंका अगदी रास्त आहे. अशी पर्यायी व्यवस्था हवी हे मलाही मान्य आहे.' ते गप्प बसले. माझी अशी कल्पना झाली की अगदी ओठांवर आलेले काही शब्द त्यांनी मागे घेतले–अगदी शेवटच्या क्षणी.

हातातला पाण्याचा ग्लास टेबलावर गोल गोल फिरवत ते म्हणाले, 'मोहन, तुझा एकविसावा वाढदिवस एवढ्यातच केव्हातरी आहे, नाही का?'

हे विषयांतर इतकं अवचित आणि अनपेक्षित होतं की काही वेळ मी गप्पच बसलो. मग म्हणालो, 'हो...या वीस सप्टेंबरलाच आहे.'

'म्हणजे दोन महिन्यांनी?'

'बाबा, विषय बदलू नका! माझ्या वाढदिवसाचा आताच्या आपल्या या चर्चेशी काय संबंध आहे?'

'मोहन, तू वीस सप्टेंबरपर्यंत थांबतोस का? मग मी तुझ्या सर्व प्रश्नांची उत्तरं तुला देईन-अगदी प्रॉमिस! मग?'

अर्थात यावर मी काय बोलणार? 'ठीक आहे.' मी म्हणालो. आणि अशा अर्धवट अवस्थेतच आमची त्या विषयावरची चर्चा थांबली.

२

माझ्या पंधराव्या वाढदिवसापासून वाढदिवसाची भेट म्हणून बाबा मला एक कोरा चेक देत असत. दोन वर्षांपूर्वी गंमत म्हणून मी त्या चेकवर सहा अंकी रकमेचा आकडा लिहिला होता आणि तो चेक बाबांना दाखवला होता. त्यांची पापणीही लवली नाही. हात हवेत उडवत ते म्हणाले, 'मला कशासाठी दाखवतोस? कोऱ्या चेकचा अर्थच तुला समजला नाही. मी त्याच्या आकड्याची चौकशीही करणार नाही. भर तुझ्या खात्यात.'

अर्थात ते मी केलं नाही. त्यांचा कोणताही चेक वापरला नाही. त्याच्यावर रफाटे मारून ते फाडून टाकीत असे. मला काय कमी होतं?

मग वीस सप्टेंबरच्या सकाळी सकाळीच बाबांनी मला शुभेच्छा दिल्या. 'मोहन,' ते म्हणाले, 'आज रात्री नाटक-सिनेमा-पार्टी असला काही कार्यक्रम आखू नकोस. वाटलं तर दुपारी जा-नाहीतर उद्या जा-पण आज रात्री घरीच राहा.'

'आपल्या त्या चर्चेचा याच्याशी काही संबंध आहे?' मी विचारलं.

'आहे.' ते एवढंच म्हणाले. त्यांच्याकडून आणखी काही स्पष्टीकरण येण्याची मी वाट पाहिली-पण ते पुढे काहीच बोलले नाहीत- आणि त्यांचा मूडही जरासा गंभीर होता. 'ठीक आहे तर.' ते म्हणाले. 'मी दिवसभर कामातच असेन-तुलाही कुठे कुठे जायचं असेल- मात्र मी सांगितलेलं लक्षात ठेव-आज रात्री घरीच राहा.'

तसा सर्व दिवस मजेत गेला, पण तो आनंद निर्भेळ नव्हता. मनावर एक

छाया होती. एक म्हणजे माझी विशी आता संपत होती. एकविसावं वर्ष लागत होतं. थोडक्यात मी आता टीनएजर राहाणार नव्हतो–आणि बाबांची ती चमत्कारिक मागणी–

इंग्लंडमधल्या सरदार–दरकदारांच्या कुटुंबातून घरच्या थोरल्या मुलाच्या अठराव्या–एकविसाव्या वर्षी त्याला घराण्यातली काही प्राचीन गुपितं उघड करून सांगण्याचे प्रकार मी कथा–कादंबऱ्यातून वाचले होते. त्याचीच मला आता आठवण येत होती. (मला कल्पना नव्हती, माझे विचार सत्याच्या किती जवळ आले होते याची!)

साडेनऊच्या सुमारास मी परत घरी आलो.

'अकरा–सव्वा अकराच्या बेतास माझ्या खोलीत ये.' बाबांचा निरोप होता.

अकरा वाजेपर्यंत मी टीव्ही पाहात होतो. कंटाळा आला तर एखादी जुनी आवडीची कॅसेट लावत होतो. पण वेळ जात चालला तसतशी मनातली उत्सुकता वाढतच चालली. शेवटी सर्व बंद करून, दिवे मालवून टाकून मी कॉटवर शांतपणे पडून राहिलो.

अर्ध्या–पाऊण तासात जर रहस्याचा उलगडा होणारच होता तर नाना तऱ्हेने तर्ककुतर्क करण्यात काय फायदा होता? त्याचा काय उपयोग होता? शेवटी मनाची अवस्था हळू हळू कमी झाली –एवढंच नाही, मला एक लहानशी डुलकीही लागली. त्यातून मी एकदम जागा झालो. अकरा–पंचवीस झाले होते. बाबांच्या खोलीत जायची वेळ झाली होती. घशाला कोरड पडली होती. घोटभर पाणी पिऊन मी खोलीबाहेर पडलो.

बाबांच्या 'ऑफिस'मधला दिवा जळत होता. आत पाय टाकला तर मला दिसलं की बाबा माझी वाटच पाहात होते. टेबलासमोरच्या खुर्चीकडे हात करीत ते म्हणाले, 'बस, मोहन.' त्यांच्याकडे पाहात पाहात मी खुर्ची मागे ओढत खुर्चीवर बसलो. बाबांच्या चेहऱ्यावर एक अगदी मंद हास्य होतं. 'मोहन,' ते म्हणाले, 'तुला वाटत असेल– हा एकविसावा वाढदिवस, ही जवळजवळ मध्यरात्रीची वेळ– मुद्दाम रहस्यमयता आणण्यासाठी मी हे केलं आहे. पण तसं मुळीच नाही. तुला मी आता जे काही सांगणार आहे ते मुळातच इतकं अकल्पित, रोमांचक, थरारक आहे की त्यात कोणतीही कृत्रिम भर घालण्याची आवश्यकताच नाही.'

'माझ्या वडिलांनी मला माझ्या एकविसाव्या वाढदिवशीच या गोष्टी सांगितल्या

आहेत. 'असंच चालत आलं आहे,' ते म्हणाले होते. 'यापेक्षा जास्त तपशीलात जाण्याची गरज नाही,' ते म्हणाले होते. मीही तुला तेच सांगतो. आता बारा वाजतील. या खोलीच्या खाली एक तळघर आहे-तिथे आपण जाणार आहोत. तिथे तुला ते दिसेलच. माझ्या वडिलांनी मला काहीच कल्पना दिली नव्हती- मला विलक्षण धक्का बसला होता. माझी शुद्धच हरपण्याच्या बेतात आली होती. त्यांनी केलं ते चूक होतं असं मला वाटतं. मी तुला आधी थोडीशी कल्पना देणार आहे, म्हणजे तुझ्या मनाची काही तयारी होईल. अर्थात तुला धक्का बसणारच आहे- कारण शब्दांनी त्याची कल्पनाच देता येत नाही. आणि डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय विश्वासच बसत नाही. तेव्हा मग ऐक-

या खोलीखाली एक तळघर आहे. तळघरात हातभर लांब, तितकाच रुंद आणि तितकाच उंच असा एक चांदीचा पिंजरा आहे. त्या पिंजऱ्यात ते आहे. दिसायला एखाद्या म्हाताऱ्या, कुरूप चेहऱ्याच्या माणसासारखं ते दिसतं. तेच त्याचं खरं रूप आहे का, नेहमी तसंच असतं, का बदलतं, मला माहीत नाही. तो आपल्याच घराण्याचा कोणी मूळ पुरुष आहे का? मला माहीत नाही. आपल्या पूर्वजांपैकी कोणी काही कठीण साधना करून त्याला वश केला आहे का? का काही युक्ती-प्रयुक्तीने त्याला 'बांधून' ठेवला आहे? पिंजरा चांदीचा का? चांदीच्या काही खास गुणधर्मासाठी आहे का? का तोही आपला एक संकेत आहे? मला माहीत नाही. पिंजऱ्याचे गज तसे बारीकच आहेत. सहज वाकवता किंवा तोडता येण्यासारखे आहेत-पण त्याने ते का केलं नाही? त्याची इच्छा नाही का त्याला ते शक्य नाही? मला माहीत नाही. जेव्हा जेव्हा मी तळघरात गेलो आहे तेव्हा तेव्हा ते पिंजऱ्यात होतं-पण इतर वेळी? एखाद्या खोलीत निरीक्षक नसेल तर मग त्या खोलीत काय आहे आणि काय नाही या विधानालाच काही अर्थ नाही, नाही का? तेव्हा इतर वेळी ते पिंजऱ्यात किंवा तळघरात असतं का नाही, मला माहीत नाही. माहीत नसलेल्या गोष्टींची यादी खूपच लांब आहे. आणखीही अनेक तुला सुचतील. माहीत असलेल्या गोष्टी अगदी मोजक्या आहेत-पण त्याच खऱ्या महत्त्वाच्या आहेत!

'पहिली-आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट. आपल्या घराण्याच्या मदतीसाठी तो इथे आहे. हे तो स्वेच्छेने करतो का काही खास कसबाने त्याला तसं करण्यास भाग पाडण्यात आलं आहे-मला माहीत नाही. पण तो मदत करतो. शंभराहून अधिक